International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 5 May-June 2024

# राजर्षी शाहू महाराज यांची दूरदृष्टी

**ऐश्वर्या नामदेव बल्लाळ**
संशोधक विद्यार्थिनी, (BSc, MA. , NET)
**Corresponding Author: ऐश्वर्या नामदेव बल्लाळ**
**Email:** aishwaryaballal18@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14196364**

**प्रस्तावना :**

लोकराजा क्षत्रियकुलवतंस श्रीमंत छत्रपती राजर्षी शाहू महाराज आबासाहेब हे महाराष्ट्रातील लोकशाहीवादी समाजसुधारक व सक्षम राज्यकर्ते होते. २६ जून १८७४ रोजी कागल येथे जन्मलेले शाहू महाराज यांनी आधूनिक दूरदृष्टी वापरुन महाराष्ट्रात समाजकार्य केले. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक पुरोगामी धोरणे यशस्वीपणे राबवली. लोकांना प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे पहिले प्राधान्य होते. त्यांच्या संपूर्ण राजवटीच्या काळात त्यांनी राज्यातील मागास जातीतील लोकांसाठी कार्य केले. स्वतः राजा असून इतर जात-पंथाची पर्वा न बाळगता सर्वांसाठी समाजकार्य करुन लोकांना लोकशाहीचा परिचय अनुभवयाला दिला.

त्यांचे मूळ नाव यशवंत जयसिंगराव घाटगे आहे. कोल्हापूरचे राजे चौथे शिवाजी व पत्नी आनंदीबाई या निपुत्रिक असल्याने राज्यकारभारासाठी कागल घराण्यातील जयसिंगराव घाटगे यांचे जेष्ठ सुपुत्र यशवंतरावांना दत्तक घेतले व 'शाहू' हे नाव ठेवले. त्यांचे प्राथमिक शिक्षण हे कृष्णाजी गोखले व हरिपंत गोखले यांच्याकडून पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण हे राजकोट येथे असलेल्या राजपुत्रांसाठी असलेल्या महाविद्यालयातून घेतले. तिथून पुढे धारवाड मधील फ्रेझर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेतले. इंग्रजी भाषा, भारताचा इतिहास, राज्यकारभारावर घडे इ. विषयांवर त्यांनी अभ्यास केला. शिक्षणाने पाया भक्कम केल्यामुळेच त्यांनी इतरांना शिक्षण देण्याचे ठरवले. त्यासाठी मोफत शाळा, वसतिगृहे सुरु केली जात-भेद न मानता शिक्षणाच्या व ज्ञानाच्या आधारावर त्यांनी राज्यात दलित लोकांना चांगल्या ठिकाणी पदावर नियुक्त केले. विविध जनहितार्थ कायदे पास केले. जलप्राप्तीसाठी धरणे बांधली, अनिष्ठ उढी परंपरा फक्त नाकारल्याच नाही तर, त्याविरोधी कायदे करुन त्या झूगारुन लावल्या. प्रत्येक गोष्टीत पुरोगामी विचार ठेवून आधुनिक महाराष्ट्राकडे वाटचाल केली.

**उद्दिष्ट्ये:**

१. राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनकार्यविर प्रकाश टाकणे.
२. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केलेले राजकीय बदल समजून घेणे.
३. राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक सुधारणांकडील वाटचाल
४. जाणून घेणे.
५. राजर्षी शाहू महाराजांनी सुरु केलेल्या वसतिगृह चळवळीचा अभ्यास करणे.
६. राजर्षी शाहू महाराजांच्या पुरोगामी विचारांचे महत्व विस्तारीत करणे.

**राजर्षी शाहू महाराजांच्या हाती राज्यकारभाराची सुत्रे :**

शिक्षण चालु असतानाच एप्रिल १८९१ रोजी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहूंचा विवाह झाला. १८९४ मध्ये वयाच्या २० व्या वर्षी त्यांचा राज्यरोहन समारंभ झाला व राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. ही गव्हर्नर लॉड हॅरीस यांनी सुपूर्त केली. यावेळी टिळकांच्या 'केसरी' मध्ये करवीर क्षेत्री 'राजकीय कपिलाष्टीचा योग' हा अभिष्टचिंतनपर लेख लिहिला. १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते.

**राजर्षी शाहू महाराजांचा राज्यकारभार :**

इ.स.१८९४ मध्ये शाहू महाराजांनी सल्लागार मंडळ तयार केले. यात मुख्य सचीव रघुनाथ सबनीस नेमले. ब्राम्हणांना नोकरीत स्थान दिले. ब्राम्हण लोकच वरिष्ठ पदांवर नेमण्याची पध्दत झुगारुन पुरोगामी विचारांचे रोप रोवले. एकिसक्युक्युटीव्ह इंजिनिअर म्हणून मराठी व्यक्तीला नेमले. १८९५ मध्ये महसुल खाते स्थापन केले. याच सर्वोच्च सहाय्यक सरसभापती म्हणून भास्करराव जाधव या मराठी व्यक्तीची नेमणूक केली. १९१८ ला कुलकर्णी वतने नष्ट करुन तलाठी पदाची नेमणूक सुरु केली. १९१८ ला महार वतने नष्ट केली.

**शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा करण्याकडे वाटचाल करणारे करण्यासाठी कारणीभूत वेदोक्त प्रकरण:**

राजघराण्यातील ब्राम्हण पुरोहितांनी वैदिक स्त्रोतानुसार म्हणजे वेदोक्त पध्दतीने धार्मिक विधी करण्यास नकार दिला. यामुळे शाहू महाराजांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. आपण स्वतः राजा असून असा भेदभाव, तर सामान्य जनतेचे काय होत असेल या विचाराने अस्वस्थ म्हणून इथून पुढे समाजकार्य करण्याचे ठरवले. त्यांनी

पुजाऱ्यांना हटवून क्षात्रजगद्गुरु ही पदवी एका तरुण मराठी व्यक्तीला देऊन ब्राम्हणेतरांचे धर्मगुरु म्हणून नियुक्ती करण्याचे धाडसी पाऊल उचलले.

**शाहू महाराजांचे सामाजिक कार्य:**

शाहू महाराजांची प्रमुख चळवळ शिक्षणप्रसार करणे व राज्यातील जातमेह कमी करणे होती. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स. १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पध्दत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात १९१९ मध्ये आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. त्यांनी विवाहा साठीचे पुरुषांचे वय १८ वर्षे व स्त्रीयांचे वय १४ वर्षे केले. इ.स. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली.

**शाहू महाराजांचे अस्पृश्यांसाठी कार्य:**

अस्पृश्यांना मुख्य प्रवाहात आणायचे असेल तर, त्यांना स्वावलंबी बनवने हे त्यांनी ओळखले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले. तसेच प्रत्यक्ष आर्थिक मदतही केली. गंगाराम कांबळे याला हॉटेल टाकून दिले. तिथे ते स्वतः चहा पिण्यासाठी जात. अस्पृश्यांना शिवण यंत्र देऊन व्यवसायात मदत केली व कपडे शिवण्याचा व्यवसाय सुरु करण्यास सांगितले. अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त हवी म्हणून त्यांनी महार, चांभार यांना सरदार अशा पदव्या दिल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्यासाठी राखीव जागा ठेवण्याचे धाडसी पाऊल त्यांनी उचलले. हा दृष्टीकोन साकारण्यासाठी त्यांनी १९०२ मध्ये कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली व त्वरित अंमलबजावणी केली. त्याकाळी अस्पृश्यांना खूप हिन वागणूक दिली जात असे. त्यांना सार्वजनिक ठिकाणी वावर करण्यावर, पाणी पिण्यावर, शाळा, दवाखाने, इमारती येथे सर्व ठिकाणी बंदी होती. पण शाहू महाराजांनी आदेश काढून सर्वांना समानतेने वागणूक दिली. १८९४ मध्ये त्यांनी वेठबिगारी पध्दत बंद गेली. एवढेच नव्हे तर पुढील काळातही जातीभेदाचे तत्व नष्ट व्हावे म्हणून त्यांनी आंतर: जातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. त्यांनी याची प्रत्यक्ष अंमलबजावणी आपल्या घरातच सुरु केली. आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील युवकाशी लावून दिले. संस्थानात जवळपास १०० मराठा धनगर विवाह लावून दिले.

**इतर वर्गासाठी समाजकार्य:**

चोर, दरोडेखोर यांची संख्या त्यावेळीही होती. त्यांना समाजात स्थान नव्हते. त्यांनाही शाहू महाराजांनी मुख्य प्रवाहात आणण्याचे ठरवले त्यांना शिक्षणात, नोकरीत संधी दिली. पहारेकरी, रखवालदार यांसारख्या नोकऱ्यांवर ठेवून घेतले. त्यांना घरे बांधण्यास मदत केली. यामुळे समाजात त्यांना चांगले स्थान प्राप्त करुन दिले. तसेच देवदासी प्रथा जोगत्या-मुरळी पध्दत बंद केली. त्यासाठी त्यांनी कायदे केले. स्त्रियांनाही समाजात समानतेची व सन्मानाची वागणूक दिली. गोर-गरीब, अस्पृश्य, दलित, चोर, दरोडेखोर या सर्वांसाठी महाराजांनी भरीव कार्य केले. व समाजात समता स्थापन केली.

**शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य:**

समाजात जर बदल हवा असेल तर लोकांना शिक्षण देवून त्यांच्यात प्रबोधन घडवून आणणे हे महाराजांना उमगले म्हणूनच त्यांनी आपल्या राज्यात सक्तीच्या शिक्षणाचा आग्रह धरला. राज्यातील स्त्रिया, अस्पृश्य यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले. त्यांनी १९१७ मध्ये प्राथमिक शाळेत फी माफीची घोषणा केली. नोव्हेंबर १९१७ मध्ये चिपरीपेटा ही प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देणारी पहिली शाळा ठरली. त्यांनी मंदिर बांधताना, त्या शेजारी शिक्षणासाठी एक खोली करणे हे बंधनकारक केले. एवढेच नव्हे तर, सर्व लोकांनी शिक्षणात सहभाग घ्यावा यासाठी, शाळेत न पाठवणाऱ्यास १ रु. दंड आकारला. शाहू महाराजांनी फक्त प्राथमिक शाळा नाहीतर त्याचबरोबर माध्यमिक शाळा, पुरोहित शाळा, सरदार शाळा, पाटील शाळा, उद्योग शाळा, संस्कृत शाळा, सत्यशोधक शाळा, सैनिक शाळा, कला शाळा, बालवीर शाळा, डोंबारी मुलांसाठी शाळा काढल्या.

**शाहू महाराजांची वसतिगृह चळवळ :**

आपल्या संस्थानापुरताच विचार न करता राज्यातीलही मुलांना शिक्षण मिळावे म्हणून महाराजांनी दूरदृष्टी विचार ठेवला व वसतिगृह चळवळ सुरु केली. त्यांनी पुढीलप्रमाणे बोर्डिंग/वसतिगृह सुरु केली.- दिगंबर जैन बोर्डिंग, विरशैव लिंगायत वसतिगृह, मुस्लिम बोर्डिंग, मिस क्लार्क होस्टेल, देवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग, नामदेव बोर्डिंग, पांचाळ ब्राम्हण वसतिगृह, श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राम्हण विदयार्थी वसतिगृह, इंडियन ख्रिश्चन होस्टेल, रावबहादूर सबनीस प्रभू बोर्डिंग, आर्य समाज गुरुकुल, वैश्य बोर्डिंग, ढोर-चांभार बोर्डिंग, शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस, सुतार बोर्डिंग, नाभिक विदयार्थी वसतिगृह, सोमवंशीय आर्यक्षत्रित बोर्डिंग, श्रीदेवांग बोर्डिंग, राजपूतवाडी बोर्डींग, रुकडी बोर्डिंग, भोई समाज बोर्डिंग अशी अनेक वसतिगृहे कोल्हापूरमध्ये सुरु केली. म्हणूनच कोल्हापूरला वसतीगृहाचे माहेरघर म्हणतात. आणि शाहू महाराजांना विद्यार्थी वसतिगृहाचे आद्य जनक म्हणतात.

**शाहू महाराजांचे दूरदृष्टीचे, कार्य:**

**१. राधानगरी धरण :**

त्याकाळी पडलेला दुष्काळ पाहून महाराजांनी पाण्याचे महत्व ओळखले व भविष्यात लोकांना दुष्काळाला सामोरे जावे लागू नये म्हणून भोगावती नदीवर राधानगरी

धरण बांधले व लक्ष्मी तलाव काढला. हे महाराष्ट्रातील पहिलेच धरण होते.

**२. कलावंतांना राजाश्रय :**

शाहू महाराजांनी कुस्ती, चित्रपट, संगीत, चित्रकला व लोककला यांना आश्रय दिला. कुस्ती मैदाने बांधली, नाट्यगृहे बांधली जी लोकांच्या कलेला अजुनही वाव देत आहेत.

**३. व्यापारातील प्रगती:**

लोकांना कायमस्वरुपी आर्थिक स्थैर्य मिळावे, यासाठी शाहू महाराजांनी बराच प्रयत्न केला. १९०६ मध्ये शाहू छत्रपती स्थिनींग अँड विव्हिंग मिलची स्थापना केली. गुळाच्या बाजारपेठा स्थापन केल्या. शेती, उद्योगात नवे प्रयोग केले. १९०७ मध्ये सहकारी तत्वावर शाहू कापड मिलची स्थापना केली.

**४. शेतीतही आधुनिकीकरण :**

शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांची स्थापना केली, शेतकऱ्यांना विविध कामासाठी कर्ज उपलब्ध केली. शेतीचे उत्पन्न वाढावे म्हणून त्यात संशोधनासाठी पाठिंबा दिला. नगदी पिके व तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यासाठी त्यांनी 'किंग एडवर्ड अॅग्रिकल्वरल इन्स्टिट्यूट' ची स्थापना केली.

**मूल्यमापन :**

भारतावर ब्रिटीशांचे राज्य चालु असताना कोल्हापूर संस्थान हे स्वतंत्र प्रगती करत राहिले. राजर्षी शाहू महाराजांनी याकाळात पूर्ण कायापालटच केला. सामान्य जनतेचा विचार करुन त्यांना न्याय मिळवून दिला. शिक्षण, समाजसुधारणा, आर्थिक सुधारणा, व्यापार, शेती, जातीभेद या क्षेत्रात त्यांनी भरघोस कार्य केले. एवढेच नव्हे तर त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातही सहभाग घेतला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आर्थिक मदत केली. त्यांनी त्यांच्या शेवटच्या पत्रात मी या जगात नसतानाही आंबेडकरांना मदत मिळाली पाहिजे हे लिहून ठेवले होते. त्यांनी अनेक वृत्तपत्रांना मदत केली. सत्यशोधक समाज, आर्य समाज यांचा पुरस्कार केला.

शाहू महाराज राजा असताना त्या काळातील जनतेचे कल्याण केलेच पण विशेष कौतुक वाटते ते त्यांनी भविष्यात निर्माण होऊ शकणाऱ्या समस्यांचेही उत्तर शोधले. त्यांनी बांधलेल्या राधानगरी धरणातून अजूनही कोल्हापूरची तहान भागतेय. त्यांनी कलेला आश्रय दिल्यामुळे कोल्हापूरातून जागतिक स्तरावर मल्ल पोहोचतायेत. गुळांची पेठ स्थापन करण्यासाठी प्रहिला प्रयत्न केल्यामुळे कोल्हापूरला आजही गुळ प्रसिद्ध आहे. त्यांनी सुरु केलेल्या कंपन्यांमुळे हजारो लोकांना रोजगार उपलब्ध झाला. म्हणून शाहू महाराजांना 'शाहू हे माणसांतील राजा होते व राजात माणूस होते' असे म्हणतात. अशा या महान राजाची सर्वांना जाणीव व्हावी, कोल्हापुरातील लोकांपासून ते जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत अशा राजाची दखल घ्यावी म्हणून माझा हा छोटासा प्रयत्न. अशा या महान राजाची सांगता न मे १९२२ मध्ये झाली व रयत एका महान व कर्तबगार शासनकर्त्यापासून वंचित झाली.

**संदर्भ ग्रंथः**

1. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१६.
2. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती; पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९७९.
3. पवार जयसिंगराव (सं.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिन कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, २००७
4. पवार वसुधा, राजर्षी शाहू छत्रपती: एक अभ्यासः सुमेरु प्रकाशन: डोंबिवली, पहिली आवृत्ती, २००४.
5. येडेकर शाम, राजर्षी एक व्यक्तीदर्शन, प्रकाशन- सतीश येडेकर, कोल्हापूर.